परिपत्रक क्र. 66

रयत शिक्षण संस्था,सातारा.
आस्थापना माध्यमिक विभाग
दिनांक :-08/03/2017

सर्व शाखाप्रमुख,
माध्यमिक विद्यालये,रयत शिक्षण संस्था,सातारा.
यांना ...

विषय : निवासी रयत गुरुकुल प्रकल्प-वसतिगृह प्रवेश परीक्षेबाबत.

**1**.ग्रामीण भागातील होतकरु व हुशार विद्यार्थ्यांची गुणात्मक वाढ होण्याच्या दृष्टीने अशा विद्यार्थ्यांना शहरात चांगल्या शैक्षणिक सुविधा देऊन तज्ज्ञ अध्यापकांच्या सान्निध्यात राहण्याची संधी निर्माण करुन देण्यासाठी गुरुकुल प्रकल्प सुरु केलेला आहे.त्यानुसार जून 1995 पासून रयत शिक्षण संस्था, मध्य विभागीय कार्यालय व कर्मवीर विद्याप्रबोधिनी मार्फत हा गुरुकुल प्रकल्प महाराजा सयाजीराव विद्यालय,सातारा येथे इ.8 वी,9 वी व 10 वी तील विद्यार्थ्यांसाठी निवासी पध्दतीने राबविला जात आहे. प्रकल्पातील मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या मूळच्या शैक्षणिक गुणवत्तेत अमूलाग्र वाढ झाली आहे. मार्च 2016 च्या परीक्षेत 95% चे पुढील - 29 व 90% चे वर 99 विद्यार्थ्यांनी गुण प्राप्त केले आहेत.या शाखेच्या गुणात्मक गौरवशाली परंपरेची नोंद राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आलेली आहे. शैक्षणिक वर्ष 2011 - 2012 मध्ये शाखेने ISO 9001:2008 मानांकन प्राप्त केले आहे.दिवसेंदिवस गुरुकुल प्रकल्पाला उज्वल यश प्राप्त होत आहे.निवासी वर्गासाठी आकर्षक वर्ग खोल्या Digital Classroom अंतर्गत Tab चे सहाय्याने नविन अध्ययन - अध्यापन तंत्राचा वापर सुरु आहे. तसेच संपूर्ण शालेय परिसरात वाय-फाय द्वारे इंटरनेट सुविधा सुरु करण्यात आली आहे.

**2.** विद्यार्थ्यांसाठी खालील सुविधा आहेत.

अ) मुले व मुली यांच्यासाठी स्वतंत्र वसतिगृह ( सर्व सोयींनीयुक्त)

ब) विद्यार्थ्यांना समतोल व सकस आहार दिला जातो.
(सकाळी दूध व अल्पोपहार,दुपारी डबा, सकाळ व संध्या.भोजन)

क) विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक मार्गदर्शन, रात्र अभ्यासिका, प्रात:अभ्यासिका, चाचण्या व सराव परीक्षा, उपचारात्मक कार्यक्रम व सर्वांगीण विकासासाठी नियोजनपूर्वक सहशालेय कार्यक्रम राबविले जातात.

**3.** या वर्षीही जून, 2017 पासून वसतिगृहयुक्त गुरुकुल प्रकल्पात इ.8 वीच्या वर्गात 50 विद्यार्थ्यांची (मुले 30 व मुली 20) वसतिगृहात सोय केली जाणार आहे.सुविधा मर्यादित असल्याने वसतिगृहासाठी विद्यार्थ्यांची वसतिगृह प्रवेश परीक्षा घेऊन वसतिगृहात जागा निश्चित केली जाणार आहे.यासाठी सन 2016 - 17 च्या शैक्षणिक वर्षात इ.7 वीच्या वर्गात शिकत असलेला विद्यार्थी पात्र राहील.

**4.**वसतिगृह प्रवेश परीक्षा रविवार दि.23/04/2017 रोजी होणार आहे. सदर परीक्षा ऑनलाईन (संगणकीय) पध्दतीने होणार असून परीक्षेची सविस्तर माहिती वसतिगृह प्रवेश परीक्षा माहिती पत्रकात वेबसाईटवर दिली आहे.

**5.**वसतिगृह प्रवेश परीक्षा माहितीपत्रक संस्थेच्या http://www.erayat.org या वेबसाईटवरील **"वसतिगृह प्रवेश परीक्षा ऑनलाईन अर्ज "** या लिंकवर उपलब्ध होईल.

**6.**वसतिगृह प्रवेश परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा आहे. सदर ऑनलाईन अर्ज http://www.erayat.org या वेबसाईटवर गुरूवार दि.09 मार्च 2017 सकाळी 11:30 पासून ते दि.रविवार 16 एप्रिल 2017 सायं 5:00 पर्यंत उपलब्ध होणार आहे. तरी आपल्या शाखेतील जे विद्यार्थी निवासी गुरूकुल प्रकल्पांच्या वसतिगृह परीक्षेस बसू इच्छितात त्यांची फी प्रत्येकी रु.500 डी.डी/एन.ई.एफ.टी/चलन द्वारे भरता येईल.या संदर्भात अधिक माहिती वेबसाईटवर उपलब्ध आहे.

7. Online फॉर्म भरताना दिलेल्या सूचना तंतोतंत पाळणे गरजेचे आहे. फॉर्म अचूक भरल्यानंतर दिलेल्या ई-मेलवर किंवा मोबाईल नंबर वर 24 तासाच्या आत फॉर्म जमा झाल्याचा संदेश मिळेल.

**8**. एकदा एका विद्यार्थ्यांचा फॉर्म भरल्यानंतर पुन्हा त्याच विद्यार्थ्यांचा फॉर्म भरु नये.

**9**. Online फॉर्म भरताना काही तांत्रिक अडचण आल्यास श्री.अली कुरेशी यांच्या 7020758595 किंवा 8888524786 या मोबाईल क्रमांकावर स.11:00 ते 6:00 वा. यावेळेत संपर्क साधावा.

**10**. आपल्या शाखेतील विद्यार्थ्यांचे ऑनलाईन फॉर्म शाखेतून भरावे. तसेच इतर विद्यार्थ्यांच्या विनंतीवरुन फॉर्म भरावे.

**11.**वेबसाईटवरील माहितीपत्रकात परीक्षेचे स्वरुप,अभ्यासक्रम,परीक्षा वेळापत्रक इ.माहिती दिलेली आहे.

**12.**वसतिगृहात प्रवेशपरीक्षेतून निवड झाली तरी इ.8 वीमध्ये महाराजा सयाजीराव विद्यालयात शासन प्रवेश प्रक्रियेनुसार प्रवेश मिळाल्यानंतरच आपला वसतिगृहात प्रवेश निश्चित केला जाईल.

**महत्त्वाचे : -** सदरचे परिपत्रक नोटीस काढून इ.7 वीच्या सर्व विद्यार्थ्यांच्या व सर्व सेवकांच्या निदर्शनास आणावे व शालेय दप्तरी नोंद ठेवावी.तसेच कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयाकडे पाठवावा.
कळावे.

(श्री. उत्तम आवारी)
**सहसचिव(माध्यमिक)**
**रयत शिक्षण संस्था, सातारा.**

प्रत माहितीसाठी -

1.मा.चेअरमन,रयत शिक्षण संस्था,सातारा.

2.मा.सचिव,रयत शिक्षण संस्था,सातारा.

3.सर्व विभागीय अधिकारी,रयत शिक्षण संस्था,सातारा.

**प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी :**
**प्राचार्य, महाराजा सयाजीराव विद्यालय, सातारा.**